॥ श्री ॥

भारतीय लोक प्रशासन संस्था, महाराष्ट्र विभागिय शाखा, आयोजित
कै. बी. जी. देशमुख वार्षिक निबंध स्पर्धा सन २०२३-२४ – पत्रक दिनांक १३/१०/२०२३.

**विषय :- जी २० : भारत टेकेड**

# "वसुधैव कुटुंबकम्"

**या वाक्यांशाचे तीन घटक शब्दांमध्ये विभाजन केले असता :**

- **वसुधा : म्हणजे 'पृथ्वी'**
- **एव : म्हणजे 'ही'**
- **कुटुम्बकम : म्हणजे 'कुटुंब'**

म्हणजेच, "पृथ्वी हे एक कुटुंब आहे" असा अर्थ होतो. ही संकल्पना सांगते की, संपूर्ण जग आणि त्याचे सर्व रहिवासी एकमेकांशी जोडलेले आहेत आणि ते एकाच कुटुंबाचा भाग असल्यासारखे वागले पाहिजे. हे सार्वभौमिक बंधुता, एकता आणि आपण सर्व लोकांप्रति दयाळूपणा आणि सहानुभूती व्यक्त केली पाहिजे, यांस प्रोत्साहन देते, त्यांचे राष्ट्रीयत्व, वंश किंवा धर्म काहीही असो. मूलत: हे विविध संस्कृती आणि राष्ट्रांमधील जागतिक एकता, शांतता आणि समजुतदारपणाच्या महत्त्वावर जोर देते. तसेच, परस्पर सहकार्य, करुणा आणि आपल्या सामायिक मानवतेची ओळख यांना प्रोत्साहन देते.

आणि हीच संकल्पना घेऊन भारताने G२० शिखर परिषदेमध्ये सहभाग घेतलाय. पण त्यासाठी आपल्याला प्रथम G२० म्हणजे काय आणि तो कसा तयार झाला, हे समजून घ्यावे लागेल.

- ## G२० ची उत्पत्ती आणि उत्क्रांती

G२० **म्हणजे** Group of २०.

G२० चे मूळ शोधत असतांना आपण जाऊन पोहोचतो, ते थेट १९६७ च्या इजिप्त आणि सिरीया इतिहासापर्यंत.

सन १९६७ मध्ये इजिप्त आणि सिरीया यांनी इस्राइलवर जो हल्ला केला त्यामध्ये इस्रायलचा विजय झाला. त्यावेळी तब्बल ६ वर्षांनतर सन १९७३ मध्ये प्रतिवार करण्यासाठी इजिप्त आणि सिरीया यांनी इस्रायलवर पुन्हा हल्ला केला. यातही इस्राइलचा विजय झाला. यालाच योमकिप्पूर वॉर असेही संबांधले जाते. या युध्दात USA चे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष Richard Nixon यांनी इस्राइलला पाठिंबा दिला.

याचा बदला घ्यायचा म्हणून म्हणून अरब देशांनी OAPEC द्वारा पश्चिमी देशांना पुरविण्यात येणाऱ्या तेलाच्या पुरवठ्यावर निर्बंध घातले. परिणामी, वाहतूक खर्च, अन्नधान्य आणि इतर सर्व वस्तूंच्या किंमती प्रचंड वाढल्या. या सगळयाचा एकत्रित परिणाम म्हणून पश्चिमी देशांमध्ये आर्थिक अस्थैर्य + मंदीची मोठ्या प्रमाणावर लाट आली आणि ही लाट बघता बघता संपूर्ण जगभर पसरत गेली.

या परिस्थितीवर मात करण्यासाठी सुरुवातीला प्रथम ४ देश एकत्र आले — त्यांमध्ये

१. U. S. A. - United States of America
२. U. K. - United Kingdom
३. फ्रान्स
४. जर्मनी

सन १९७३ मध्ये सगळयात प्रगत अर्थव्यवस्था असलेल्या या ४ देशांच्या वित्त मंत्र्यांनी अरब राष्ट्रांनी तेलाच्या पुरवठ्यावर लावण्यात आलेल्या निर्बंधांवर एकजूटीने निर्णय घेण्यासाठी White House मध्ये अनौपचारीक बैठका घेण्यास सुरुवात केली. त्यानंतर इटली व जपान आणि त्यानंतर ३ वर्षांनी म्हणजेच सन १९७६ मध्ये कॅनडालाही यांना आपल्याबरोबर घेतले.

ह्या ७ देशांच्या समुहाला Group of ७ म्हणजेच G७ असे संबोधले जाऊ लागले.

या ७ देशांमध्ये २ स्तरांवर साम्य असलेल्या मुद्द्यांवर हे देश एकत्र आले होते, ते म्हणजे -

| **स्तर-१** | **स्तर-२** |
|---|---|
| आर्थिक | राजकीय |
| विकसित देश | लोकशाही व्यवस्था |
| सर्वात मोठी प्रगत अर्थव्यवस्था | शीत युध्दाचा काळ |

त्यानंतर, २२ वर्षानंतर ह्या Group of ७ म्हणजेच G७ मध्ये आणखी एका देशाचा समावेश झाला — तो म्हणजे रशियाचा. म्हणून Group of ८ म्हणजेच G८.

परंतु, शीत युध्द संपल्यानंतर रशियाची अशी भूमिका होती की, बाकी काहीही होवो, परंतु आमच्या Back Yard मध्ये कुणीही हस्तक्षेप करता कामा नये. परंतु, सन २०१४ मध्ये रशियाला क्रीमिआ वर हल्ला करावा लागला. परिणामी, रशियाला Group of ८ म्हणजेच G८ मधून काढून टाकण्यात आले आणि हे ७ देश पुन्हा Group of ७ म्हणजेच G७ ओळखले जाऊ लागले.

वरील सर्व घटना घडत असतांनाच, सन १९९७ मध्ये थायलंडमध्ये चलनाचे अवमूल्यन होऊ लागले. त्याकडे थायलंडने दुर्लक्ष केले आणि त्याचा परिणाम म्हणून आर्थिक आपत्तीस सुरुवात झाली आणि ती आजूबाजूचे देश i.e. मलेशिया, फिलीपाईन्स आणि इंडोनेशिया यांमध्ये देखील पसरली.

ऑक्टोबर-१९९७ मध्ये ही आर्थिक आपत्ती जाऊन पोहोचली साऊथ कोरीयामध्ये. त्यावेळी साऊथ कोरीयामध्ये त्यांच्या मुलभूत गरजा भागविण्या इतपत देखील परिस्थिती नव्हती. त्यामुळे तेथील सरकार कोसळण्याची वेळ ओढवली.

त्यावेळी, G७ मध्ये समाविष्ट असलेल्या देशांच्या लक्षात आले की, सन १९९१ नंतर आलेल्या जागतिकीकरणाच्या लाटेमुळे सगळे देश परस्परांमध्ये जोडले गेले आहेत. त्यातून उद्भवणाऱ्या समस्यांचे परिणाम आता संपूर्ण जगावर दिसून येऊ लागलेत. आता, अशा प्रकारच्या गंभीर समस्यांना सामोरे जाण्यासाठी आपण केवळ ७ देश पुरे पडणार नाही आहोत.

ही गोष्ट लक्षात घेता, G७ च्या विस्ताराचा विचार सुरु झाला.

यामुळे, जर आपल्याला आपली स्वत:ची आणि जागतिक अर्थव्यवस्था सुरक्षित ठेवायची असेल आणि आजूबाजूच्या देशांमध्ये येणाऱ्या अडचणींचे परिणाम आपल्या देशांमधील अर्थव्यवस्थेवर होऊ द्यायचे नसतील तर, आपल्याबरोबरीने आणखीही काही देशांना i. e. विकसित व विकसनशील देशांना देखील समाविष्ट करुन घेणे देखील गरजेचे आहे.

मग, G७ चा विस्तार करण्यासाठी मुख्यत: ३ निकष ठरविण्यात आले. ते म्हणजे —

**१) G७ चे सर्व देश + रशिया i. e. again G८**

१) U. S. A. - United States of America
२) U. K. - United Kingdom
३) फ्रान्स
४) जर्मनी
५) इटली
६) जपान
७) कॅनडा
८) रशिया

**२) त्यावेळचे सर्वात मोठे देश - ज्यामध्ये त्या देशाची आर्थिक परिस्थिती, साधनसामग्री, लोकसंख्या यांचा सर्व बाबींचा विचार करुन समावेश करण्यात यावा — मग यामध्ये ---**

९) ब्राझिल

**अफ्रिका खंडातून —**

१०) साऊथ अफ्रिका

**अशिया खंडातून -**

११) भारत

१२) चीन

या ४ देशांचा समावेश करण्यात आला.

३) **असे देश की जे आर्थिक, साधनसामग्री किंवा लोकसंख्येच्या दृष्टीने मोठे तर नाहीयेत पण त्यांचा आपल्या स्वत:च्या भागामध्ये दबदबा आहे --- मग यामध्ये ---**

१३) **उत्तर अमेरिकेतून** — मेक्सिको

१४) **दक्षिण अमेरिकेतून** — अर्जेंटिना

१५) युरोपातून — European Union

१६) असा एक देश जो युरोप आणि अशिया अशा दोन्हीही खंडांमध्ये समावेश होतो, तो म्हणजे — तुर्की

**मध्य पूर्वेतून**

१७) सौदी अरेबिया

**दक्षिण-पूर्व म्हणजेच आग्नेय अशियामधून**

१८) इंडोनेशिया

१९) दक्षिण कोरिया

**आणि सर्वात शेवटी महासागरीय क्षेत्र प्रदेशातून**

२०) ऑस्ट्रेलिया.

**अशा सर्व देशांचा मिळून सन १९९९ मध्ये जो ग्रुप बनला तो म्हणजे "Group of २० म्हणजेच G२०"**

- **उद्दिष्टे --**

सन १९९९ च्या आधी काही काळापासून अशिया खंडातील देशांना सातत्याने करावा लागणारा आर्थिक संकटांचा सामना आणि त्यांवर परस्पर सामंजस्याने चर्चा करुन तोडगा काढण्यासाठी G२० ची स्थापना करण्यात आली.

त्यानंतर, सन २००८ मध्ये अमेरिकेमध्ये आलेले जागतिक आर्थिक संकट, जे 'लेहमन ब्रदर्स' यांच्या नावे ओळखले जाते, त्याची सुरुवात झाली. त्यावेळी वित्त मंत्री व मध्यवर्ती बँकेचे गर्व्हनर्स यांच्या अनौपचारीक बैठकांमधून असे लक्षात आले की, आता केवळ एकट्या आर्थिक संकटाबाबतचा विचार करुन चालणार नाही तर, जागतिक स्तरावर ज्या काही बऱ्या-वाईट गोष्टी घडत आहेत आणि त्यांचा सामना

करावा लागतो आहे, अशा सर्व गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे. आणि तेव्हापासून Group of २० म्हणजेच G२० ला **G२० समिट** म्हणून संबोधले जाऊ लागले. ज्यामध्ये त्या-त्या संबंधित देशाचे मुख्य प्रतिनिधी (Heads) आपापल्या देशाचे प्रतिनिधीत्व करु लागले आणि त्यांनी आपला Agenda विस्तारीत करुन त्यामध्ये खालील यांचा देखील समावेश करण्यात आला --

- आर्थिक रचना,
- जागतिक आर्थिक वाढ व स्थैर्य
- ग्लोबल वॉर्मिंग, हवामानातील बदल आणि आरोग्य,
- आंतरराष्ट्रीय आर्थिक सहयोग,
- आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आर्थिक बाजार यांच्या नियंत्रणास प्रोत्साहन देणे आहे,
- जगाची बदलती परिस्थिती व त्याअनुषंगाने येणारे महत्वाचे मुद्दे,
- आतंकवाद, मानव तस्करी,
- व्यापार, शेती, रोजगार, उर्जा, भ्रष्टाचाराविरुध्दची लढाई, दहशतवाद इ.
- हवामानातील बदल
- दहशतवाद विरोधी भूमिका
- महत्वाचे जागतिक घटक

**हीच कार्यसूची आकृतीद्वारे अधिक स्पष्ट होते :-**



यामधील सदस्य असलेल्या देशांकडे एकूण जगाच्या --

GDP च्या ८०%,

लोकसंख्येच्या ७०%, तर

जागतिक व्यापारात ७५%


इतका वाटा आहे. तसेच त्यात सर्व खंडातील देशांचा समावेश होत असल्याने, अशा समिट मध्ये घेण्यात आलेल्या निर्णयांचा जागतिक अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होतो.

**म्हणून G२० ला अनन्य साधारण महत्व प्राप्त होते.**

**पण मग आता, ह्या G२० ची रचना कशी आहे, ते कसे कार्य करते हे प्रश्न पडू लागले ---**

**पहिले आपण G२० संरचना पाहू या ---**

- **संरचना ---**




**कोणतेही स्थायी सचिवालय नसलेला एक अनौपचारीक गट --**

ह्यामध्ये कोणत्याही Groups उदाहरणार्थ - United Nations Framework of Climate Change, Civilian Conservation Corporations, etc. यांनी घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी "Executives" महत्वाचे असतात, यामध्ये २ प्रकार येतात, ते म्हणजे ---

१) राजकीय (Political) i.e. Finance Ministers आणि

२) स्थायी (Permanent) i.e. Secretariate of Finance Ministers i.e. Role of I.A.S. etc.

हा एक अनौपचारीक गट असल्याने, याचे कार्य पार पाडण्यासाठी कुठेही सचिवालय नाही. त्यामुळे यामध्ये निर्णय तर घेतले जातात परंतु, त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी कोणतेही स्थायी सचिवालय नाही. याच कारणासाठी **ट्रॉयका सिस्टिम** तयार करण्यात आली.

**पुन्हा ट्रॉयका सिस्टिम ही एक नवीन संकल्पना असल्याने म्हणजे काय हा प्रश्न येतो.**

**त्यासाठी ट्रॉयका सिस्टिम म्हणजे काय ते पाहूया --**

परराष्ट्र मंत्रालयातील प्रतिनिधी (शेर्पा), केंद्रीय बँक गव्हर्नर्स आणि जागतिक नेत्यांचा समावेश असलेल्या जी-२० च्या वार्षिक कार्यक्रमांमध्ये संपूर्ण वर्षभरात तयार करण्यात आलेल्या धोरणांवर राज्य किंवा सरकारच्या प्रमुखांच्या परिषदेमध्ये एक संयुक्त घोषणापत्र प्रसिध्द केले जाते.

दरवर्षी नवीन अध्यक्ष राष्ट्राची निवड करण्यात येते. हे नवीन अध्यक्ष राष्ट्र मागील वर्षाचे अध्यक्ष राष्ट्र आणि पुढील वर्षी होणारे अध्यक्ष राष्ट्र यांना समवेत घेऊन वाटचाल करण्यासाठी म्हणजेच संयुक्त घोषणापत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी एक Link तयार करतो.. त्यामुळे जी-२० समूहाच्या कार्यसूचीचे सातत्य सुनिश्चित करण्यात येते. या पध्दतीलाच **' ट्रॉयका '** म्हणून देखील ओळखले जाते,

**जसे —**




सन २०२३ चे अध्यक्षपद भारताकडे असल्याने भारत पूर्वाश्रमीच्या म्हणजे सन २०२२ मध्ये अध्यक्षपद भूषविलेल्या इंडोनेशिया हे अध्यक्ष राष्ट्र आणि आगामी वर्षी म्हणजेच सन २०२४ मध्ये अध्यक्षपदाची धूरा सोपविलेल्या ब्राझिल हे अध्यक्ष राष्ट्र या दोघांनाही समवेत घेऊन आपली पुढील वाटचाल करीत आहे.

या **ट्रॉयका सिस्टिम** मध्ये सुध्दा ३ प्रवाह दिसून येतात. ते म्हणजे —

G२० मध्ये असणारे तीन समांतर प्रवाह :-

१. वित्तिय
२. शेर्पा आणि
३. प्रतिबध्द गट म्हणजेच Engagement Groups

**१. वित्तमंत्री आणि मध्यवर्ती बँकांचे गव्हर्नर हे वित्तिय विषयक बाबींचे नेतृत्व करतात.**

यामध्ये G२० चे अर्थमंत्री आणि केंद्रीय बँक गव्हर्नर्स यांच्या बैठकांद्वारे आर्थिक आणि विनिमय दर धोरणे, गुंतवणूक, आर्थिक नियम, आंतरराष्ट्रीय कर, इत्यादी मुद्दयांवर लक्ष केंद्रीत करण्यात येते.

**२. शेर्पा - म्हणजेच दूत**


यामध्ये, राजकीय समस्यांसह, भ्रष्टाचार विरोधी, विकास, व्यापार तसेच, हवामानातील बदल, लैंगिक समानता अशांसारख्या व्यापक मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करुन त्यामध्ये G२० च्या सदस्य देशांमधील मंत्री, नियुक्त करण्यात आलेला शेर्पा आपल्याशी संबंधित देशाच्या नेत्याच्या वतीने नियोजन, वाटाघाटी व अंमलबजावणी करण्याच्या कार्यात व्यस्त असतात. त्यानंतर शेर्पा G२० च्या बैठकीतील प्रगतीविषयी राज्य किंवा शासनाच्या प्रमुखांना माहिती देतात व कार्यरत असलेल्या संबंधित गटांशी संवाद साधून त्या विषयाचे प्रतिनिधित्व करतात.

भारताचे शेर्पा म्हणून श्री. अभिताभ कांत यांची निवड करण्यात आली. त्यांनी नीती आयोगाचे CEO म्हणून देखील काम पाहिले आहे.

३. **प्रतिबध्द गट i.e. Engaged Groups ---**

G२० मध्ये विविध स्तरावर कार्यरत असलेले असे एकूण १३ प्रतिबध्द गट i.e. Engaged Groups आहेत --

**हे पुढील आकृतीच्या सहाय्याने अधिक स्पष्ट होते ---**




हे सर्व गट आपापल्या स्तरावर कार्यरत असतात आणि आपण केलेल्या कामांची माहिती वेळोवेळी राष्ट्रप्रमुखांना देत असतात.

**आता, त्यानंतर येते ते म्हणजे अध्यक्षता ---**

## अध्यक्षता

सन २००८ मध्ये ज्यावेळी समिट म्हणून बैठका होण्यास सुरुवात झाली त्यावेळी पहिली बैठक झाली ती वॉशिंग्टन, USA मध्ये — तत्कालीन अध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू बुश यांच्या अध्यक्षतेखाली.

तेव्हापासून ते आतापर्यंत फिरत्या क्रमावर (Rotational Basis) आधारीत अध्यक्षता देण्याचा प्रघात सुरु असल्याने प्रत्येक सदस्य देशास साधारणपणे २० वर्षांतून एकदा हा मान मिळतो.

जी-२० च्या सदस्य देशांपैकी, एखाद्या विशिष्ट वर्षासाठी बैठकीचे आयोजन करण्यासाठी हे २० देश ५ वेगवेगळया गटांमध्ये विभागले जातात. प्रत्येक गटात साधारणपणे जास्तीत जास्त राष्ट्र ४ राष्ट्रांचा समावेश करण्यात येतो. प्रत्येक वर्षी एक वेगळा देश दिनांक ०१ डिसेंबर पासून ते ३० नोव्हेंबरपर्यंत अध्यक्षपद स्विकारतो. ही प्रणाली सन २०१० पासून अस्तित्वात आली आहे.

हे सदस्य देश ५ गटांमध्ये विभागलेले आहेत. त्यासोबत त्यांनी भूषविलेले अध्यक्षपदाचे वर्ष: -

| Group-१ | Group-२ | Group-३ | Group-४ | Group-५ |
|---|---|---|---|---|
| ऑस्ट्रेलिया (२०१४) | भारत (२०२३) | अर्जेंटिना (२०१८) | फ्रान्स (२०११) | चीन (२०१६) |
| कॅनडा (२०१०-१) | रशिया (२०१३) | ब्राझील (२०२४) | जर्मनी (२०१७) | इंडोनेशिया (२०२२) |
| सौदी अरेबिया (२०२०) | साऊथ अफ्रिका (२०२५) | मेक्सिको (२०१२) | इटली (२०२१) | जपान (२०१९) |
| युनायटेड स्टेट्स (२००८) | तुर्की (२०१५) | | युनायटेड किंग्डम् (२००९) | साऊथ कोरीया (२०१०-२) |

**म्हणजेच, भारत Group-२ चा सदस्य आहे.**

आतापर्यंत पुढील देशांकडून G२० च्या शिखर परिषदांचे आयोजन करण्यात आले आहे :-

| शिखर परिषद क्रम | वर्ष | स्थळ |
|---|---|---|
| १ | १५ नोव्हेंबर २००८ | वॉशिंग्टन, युनायटेड स्टेट्स |
| २ | २ एप्रिल २००९ | लंडन, युनायटेड किंग्डम |
| ३ | २४-२५ सप्टेंबर २००९ | पिट्सबर्ग, युनायटेड स्टेट्स |
| ४ | २६-२७ जून २०१० | टोरॉंटो, कॅनडा |
| ५ | ११-१२ नोव्हेंबर २०१० | सोल, कोरिया |
| ६ | ३-४ नोव्हेंबर २०११ | कान्स, फ्रान्स |
| ७ | १८-१९ जून २०१२ | लॉस कॅबोस, मेक्सिको |
| ८ | ५-६ सप्टेंबर २०१३ | सेंट पीटर्झबर्ग, रशिया |
| ९ | १५-१६ नोव्हेंबर २०१४ | ब्रिस्बेन, ऑस्ट्रेलिया |
| १० | १५-१६ नोव्हेंबर २०१५ | अंताल्य, तुर्की |
| ११ | ४-५ सप्टेंबर २०१६ | हांगजो, चीन |
| १२ | ७-८ जुलै २०१७ | हॅंबर्ग, जर्मनी |
| १३ | ३० नोव्हेंबर-१ डिसेंबर २०१८ | मेंदोसा, अर्जेंटिना |
| १४ | २०१९ | ओसाका, जपान |
| १५ | २०२० | रियाद, सौदी अरेबिया |
| १६ | ३०-३१ ऑक्टोबर २०२१ | रोम, इटली |
| १७ | १५-१६ जुलै २०२२ | बाली, इंडोनेशिया |
| १८ | ९-१० सप्टेंबर २०२३ | नवी दिल्ली, भारत |
| १९ (प्रस्तावित) | २०२४ | ब्राझील |

या पध्दतीतूनच सन २०२३ ची अध्यक्षता भूषविण्याचा मान भारतास मिळाला.

**अध्यक्षपदाचा मान मिळलेल्या देशास विशेष सुविधा उपलब्ध असते जी की,** तो सदस्य देशांव्यतिरीक्त इतरही देशांना निमंत्रित करु शकतो. त्यानुसार भारताने पुढील अतिथी देशांना व संघटनांना निमंत्रित केले ---

| | | |
|---|---|---|
| बांग्लादेश | स्पेन | नेदरलॅंड |
| सिंगापूर | मॉरिशस | नायजेरिया |
| इजिप्त | संयुक्त अरब अमिराती | ओमान |

यामधील स्पेन हा कायमस्वरुपी अतिथी देश आहे.

त्याचप्रमाणे जी-२० च्या सदस्य नसलेल्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील संघटना :-

१ आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (International Monetary Fund)

२ जागतिक बँक (World Bank)

३ जागतिक आरोग्य संघटना (World Health Organisation)

४ जागतिक व्यापार संघटना(World Trade Organisation)

५ आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (International Labour Organisation)

६ वित्तिय स्थिरता बोर्ड (Financial Stability Board)

७ आर्थिक सहयोग व विकास संघटना (Organization for Economic Co-operation and Development (OECD),

८ इतर प्रादेशिक संघटना, जसे

९ अफ्रिकन युनियन

१० अशियाई विकास बँका (Asian Development Bank)

११ Association of Southeast Asian Nations - ASEAN

१२ The New Partnership for Africa's Development

- **भारताचा जी-20 अध्यक्षीय कार्यकाळ**

हा कालावधी म्हणजे - **दिनांक १ डिसेंबर २०२२ ते ३० नोव्हेंबर २०२३**

यासाठी भारताने पुढील बोधचिन्ह व थीम निश्चित केली आहे —

G20

भारत 2023 INDIA

वसुधैव कुटुम्बकम्

ONE EARTH • ONE FAMILY • ONE FUTURE

- **भारताची G२० च्या अध्यक्ष काळासाठी संकल्पना —**

यासाठी भारताने सगळयात अनोखी अशी संकल्पना संस्कृत महाउपनिषदातून **"वसुधैव कुटुंबकम्"** म्हणजेच **"एक पृथ्वी एक कुटुंब"** घेतली असून ती सर्व प्रकारच्या म्हणजे मानव, प्राणी, वनस्पती आणि सूक्ष्मजीव अशा सर्वांच्या जीवनाचे आणि पृथ्वी या ग्रहावर आणि व्यापक विश्वामध्ये त्यांच्यातील परस्परसंबधांचे महत्त्व अधोरेखित करते.

त्याचप्रमाणे ती, ज्यामुळे स्वच्छ, हरित आणि नील भविष्य निर्माण करणाऱ्या जागतिक परिवर्तनकारक उपाययोजनांची निर्मिती होते, अशा "लाईफ" (पर्यावरणासाठी जीवनशैली) या उपक्रमावर त्याच्याशी संबंधित, पर्यावरणीय दृष्ट्या शाश्वत आणि जबाबदार पर्यायांसह भर देते.

भारताचा अध्यक्षीय कार्यकाळ हा स्वातंत्र्याच्या अमृतकाळापासून म्हणजेच ७५ व्या वर्षापासून सुरु होऊन स्वातंत्र्याच्या शताब्दीपर्यंत **भविष्यवेधी, समृद्ध, समावेशक आणि विकसित समाजाच्या पूर्ततेच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या आणि मानवकेंद्री दृष्टीकोन** केंद्रस्थानी ठेवणाऱ्या २५ वर्षांच्या कालखंडाच्या प्रारंभासोबतच सुरू झाला असल्याने **भारतासाठी हा कार्यकाळ विशेष महत्त्वाचा आहे**. या काळात भारताकडून कोणकोणत्या कामांकडे प्राथम्याने लक्ष देण्यात येणार आहे, ते आता लक्षात घेऊ ---

- **G२० अंतर्गत भारताचे प्राधान्यक्रम काय आहेत —**

१) **गतिमान, सर्व समावेशक आणि लवचिक विकास** -

संरचनात्मक परिवर्तन घडवून आणून त्यामध्ये जागतिक व्यापारात MSME च्या एकत्रीकरणाला गती देणे, वाढीसाठी व्यापाराची भावना आणणे, कामगार अधिकारांना प्रोत्साहन देणे आणि कामगार कल्याण सुरक्षित करणे, जागतिक कौशल्यांमधील अंतर दूर करणे आणि समावेशी कृषी मूल्य साखळी आणि अन्न प्रणाली तयार करणे, इ.

२) **शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांना गती देणे —**

भारताने कोविड-१९ चे हानिकारक प्रभाव लक्षात घेऊन त्यावर कृती करण्याच्या सध्याच्या दशकाचे पुनर्प्राप्तीच्या दशकात रुपांतर केले. या दृष्टिकोनाशी सुसंगत राहून सन २०३० पर्यंत शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्याच्या दिशेने G२० गटाद्वारे प्रयत्नांची पराकाष्ठा करण्यावर भर देणे

३) **तंत्रज्ञानात्मक परिवर्तन आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा —**

मानवकेंद्री दृष्टिकोनावर विश्वास ठेवून सार्वजनिक डिजिटल पायाभूत सुविधा, आर्थिक समावेशकता आणि कृषीपासून शिक्षणापर्यंतच्या विविध क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञान-सक्षम विकास यासारख्या प्राधान्य क्षेत्रांमध्ये अधिकाधिक ज्ञानाची देवाणघेवाण करणे.

४) **२१ व्या शतकासाठी बहुपक्षीय संस्था —**

अधिक जबाबदार आणि सर्वसमावेशक आंतरराष्ट्रीय संस्थासाठी सुधारित बहुराष्ट्रीयवादासाठी जोर लावून एक अशी आंतरराष्ट्रीय व्यवस्था की ज्यामध्ये, सर्वसमावेशक, न्याय्य, समान आणि बहुध्रुवीय प्रतिनिधित्व असेल, एकविसाव्या शतकातील आव्हानांचा सामना करण्यास योग्य असेल अशी व्यवस्था तयार करण्याचा प्रयत्न

५) **महिला नेतृत्वाखालील विकास —**

महिला सशक्तीकरण आणि प्रतिनिधित्व ह्या दोन मुद्यांच्या सहाय्याने सर्वसमावेशक वाढ आणि विकास साधण्यासाठी प्रयत्न करणे

त्याचप्रमाणे, भ्रष्टाचाराशी लढण्यासाठी करचुकवेगिरी तपासणे, दहशतवादी निधीची गळचेपी, रेमिटन्सच्या खर्चात कपात, प्रमुख औषधांसाठी बाजारात प्रवेश, जागतिक व्यापार संघटनेच्या कामकाजात सुधारणा करण्यासाठी सुधारणा, पॅरिस कराराची "पूर्ण अंमलबजावणी" इ.

या सर्व गोष्टींना प्राधान्यक्रम देत असतांना भारताची भूमिका काय असणार आहे, ते कशाप्रकारे तडीस नेणार आहे, याची तर उत्सुकता आहेच. चला तर मग, बघू या भारताची भूमिका काय आहे ---

- **G२० अंतर्गत भारताची भूमिका —**


सन १९९९ मध्ये G२० मध्ये एक संस्थापक सदस्य म्हणून सामील झाल्यानंतर भारताची अर्थव्यवस्था ही अलिकडच्या काही वर्षांमध्ये सरासरी ६-७% दराने जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था बनली आहे. त्यादृष्टीने भारताचे जागतिक आर्थिक विकासात योगदान म्हणजे —

- देशांतर्गत धोरणे,
- परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे,
- उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी विविध आर्थिक सुधारणांची अंमलबजावणी करणे — उदाहरणार्थ — उत्पादनवाढीला चालना देण्यासाठी आणि नवीन नोक-या निर्माण करण्यासाठी शासनाने सुरु केलेला उपक्रम - **"मेक इन इंडिया"**
- डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि तंत्रज्ञानात प्रवेश करण्यासाठी सुरु केलेली मोहिम - **"डिजिटल इंडिया"**
- त्याचप्रमाणे G२० मधील सदस्य देशांबरोबर आपले अनुभव सामायिक करुन तशाच प्रकरच्या धोरणांचा स्वीकार करुन देशाच्या विकासास चालना देणे,
- आंतरराष्ट्रीय व्यापाराशी संबंधित मुद्द्यांवरील सहभागातून जागतिक आर्थिक विकासात योगदान देणे,
- मुक्त व्यापाराचा खंबीर पुरस्कर्ते म्हणून, भारत सर्व देशांना, विशेषत: विकसनशील अर्थव्यवस्थांना लाभ देणाऱ्या अधिक मुक्त आणि सर्वसमावेशक व्यापार प्रणालीला चालना देणे,

- आर्थिक स्थिरता सुनिश्चित करण्यासाठी आणि भविष्यातील आर्थिक संकटांना रोखण्यासाठी बँकिंग पर्यवेक्षणासाठी Basel III Framework सारख्या जागतिक वित्तीय नियमांच्या अंमलबजावणीला प्रोत्साहन देणे,
- भारताने अक्षय ऊर्जेला चालना देण्यासाठी सुरु करण्यात आलेले उपक्रम — International Solar Alliance, ज्याचे सन २०३० पर्यंत सौरऊर्जेमध्ये $१ ट्रिलियन गुंतवणुकीचे उद्दिष्ट असून स्वच्छ ऊर्जा प्रकल्पांना वित्तपुरवठा करणारा राष्ट्रीय स्वच्छ ऊर्जा निधीसाठी अधिक शाश्वत ऊर्जा प्रणालीच्या संक्रमणाला गती देणे व पर्यावरणीय स्थिरतेला प्रोत्साहन देणे

इ.

**ही भूमिका पुढील आकृतीमधून अधिक चांगल्या पध्दतीने स्पष्ट होते —**



- **G२० अंतर्गत भारताकडून घेण्यात आलेले Initiatives —**

१) **G२० मध्ये अफ्रिकन युनियनचा समावेश —**

**ज्याचा परिणाम म्हणून G२० ऐवजी G२१ संबोधले जाऊ शकते.**

अवघे ५०-५५ सदस्य असलेल्या दक्षिण अफ्रिकेतील गरीब राष्ट्रांची जी अफ्रिकन युनियन आहे त्यांचा **आवाज** म्हणून भारताची ओळख निर्माण होऊ शकते.

यामध्ये भारताच्या "सबका साथ सबका विकास" ह्या तत्वाचा vision of Inclusivity समावेश करण्यात आला.

२) India-Middle East — Europe Economic Crridor "Modern Spice route —

भारत-मध्य पूर्व- युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉर, एक किफायतशीर क्रॉस-बॉर्डर शिप-टू-रेल्वे ट्रान्झिट नेटवर्क, जे भारताला अरब देश, EU आणि USA शी जोडेल. ह्रा कॉरिडॉर भारतीय व्यवसायांसाठी व्यापार आणि गुंतवणुकीच्या संधींमध्ये रुपांतरित होऊ शकेल,

३) **काळ्या समुद्रातील धान्य उपक्रमाचे पुनरुज्जीवन** (Revival of black sea grain initiative) — यामध्ये United Nation कडून रशिया-युक्रेन युध्दात अन्नधान्याचा पुरवठा सुरळीत होण्याबाबत करार करण्यात आला होता.

यामध्ये दोन्हीही देशांना वाईट न ठरवता त्यांच्याकडून होणारी चूक निदर्शनास आणून दिली. रशियाच्या युक्रेनवरील आक्रमणाचा स्पष्ट निषेधही करण्यात आला नाही. यातूनच आपल्या स्वतंत्र परराष्ट्र धोरणातील खंबीरपणा / ठामपणा सर्व जगाला दर्शवून देण्यात आला.

४) **वाजवी आणि शाश्वत कर प्रणाली** ( Fair and sustainable tax system )

ज्या ठिकाणी करमर्यादा सर्वात कमी आहे अशा ठिकाणी सुरु करण्यात आलेल्या Base erosion and profit shifting या तत्वावर गुंतवणूक करणाऱ्या कंपन्यांना अटकाव घालण्यास मदत झाली, त्यामुळे

अशा कंपन्यांमुळे होणारे अंदाजे नुकसान $१००-२४० इतके होणारे नुकसान टाळले जाण्यास मदत झाली.

त्यालाच **GLOBE i.e. Global Anti-Base Erosion Approch** असेही संबोधले जाते.

५) Digital infrastructure —

याबाबत २ मुद्दे मांडण्यात आले. ते म्हणजे —

- Safe, Secure, accountable, and inclusive Digital infrastructure असायला हवी. आणि
- Call for protection of International Property Rights

  अशाप्रकारचे infrastructure विकसित झाल्यास विविध स्तरांवर असणाऱ्या **Digital Divide** मिटविण्यास मदत करेल. जसे —

| **ठिकाण १** | **ठिकाण २** |
|---|---|
| 4G | 5G |
| Chat GPT | No Internet Access |

- UPI App चा व्यवहारातील वापर वाढविण्यास प्रोत्साहन देणे — हे देशासाठी योगाप्रमाणेच soft diplomacy सारखे काम करेल.
- यामध्ये देशांतर्गत होणाऱ्या पारंपारिक उत्पादनांना संरक्षण देणे — जसे —

  अदिवासी बांधवांकडून वापरण्यात येणारी पारंपारिक औषधे (जडी-बूटी, इ.) देशाबाहेरील लोक येऊन ही पध्दती शिकून घेतात आणि नंतर त्यांच्या देशात जाऊन त्याचे patent बनवून मोकळे होतात. याचा परिणाम म्हणजे, पारंपारिक औषधांच्या बाबतीत आपल्या देशातील जे खरे ज्ञानी अदिवासी बांधव आहेत जे वंचित रहात होते. यालाच Biopiracy असे संबांधले जाते.

  International Property Rights द्वारे यालादेखील बंधन घालणे शक्य झाले आहे.

६) Millet Trilogy —

सगळयात जास्त उत्पादन कर्ता आणि निर्यात कर्ता = भारत.

त्यामुळे यांपासून बनविण्यात आलेले पदार्थांना जागतिक स्तरावर मोठी मागणी मिळाल्यास भारताला मोठा आर्थिक फायदा होऊ शकतो.

७) **जागतिक आरोग्य - एक आरोग्य दृष्टीकोन** ( Global health - one health approach )

यालाच 'Manhattan Principle' असे म्हटले जाते.

या तत्वानुसार मानवाचे आरोग्य हे पृथ्वीवर राहणाऱ्या मनुष्यप्राण्या व्यतिरिक्त इतरही प्राणीमात्रांशी संलग्न आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर जे जे साथींचे आजार फैलावतात उदा. कोविड-१९, स्वाईन फ्ल्यू, इ. यांचा परिणाम ह्या प्राणिमात्रांवर देखील होत असतो.

मांसाहार स्विकारणाऱ्या व्यक्तींमध्ये देखील पाणी प्रदुषणामुळे आजार फैलावण्याचे प्रमाण वाढतांना दिसून येते.

त्याचप्रमाणे वारंवार होणाऱ्या वातावरणीय बदलांमुळे पृथ्वीचे आरोग्य देखील धोक्यात येते.

यावरुन हे लक्षात येते, आपल्याला पाणी, पशु-पक्षी, इ. यांच्या आरोग्याची देखील काळजी घेतल्यास मानवाचे आरोग्य सुरक्षित राहू शकेल.

यालाच Bio Accumulation and Bio Magnification असे संबोधले जाते.

**जसे,**

**The One Health Triad**



८) **जागतिक जैवइंधन युती (Global Biofuel Alliance)**

यामध्ये वापरण्यात येणाऱ्या पेट्रोल व जैवइंधन यांच्या मिश्रणाचे प्रमाण ८०:२० करण्याबाबत आवाहन करण्यात आले.

याचा परिणाम म्हणून International Solar Alliance द्वारे नेतृत्वाची पायाभरणी, सन २०७० पर्यंत शून्य कार्बन एमिशन च्या पूर्णत्वाकडे जाण्यास मदत, इ.

यामुळे भविष्यात आपण दावा करु शकतो की, जागतिक संक्रमण कालावधीमध्ये देखील आम्ही instrumental होतो.

तसेच, भाताच्या पीकावरील साळ (Husk) जाळल्यामुळे जे प्रदूषण कमी करण्यासाठी असे भाताच्या पीकावरील साळ (Husk) न जाळता ते जैवइंधन मध्ये रुपांतरीत करुन अशा प्रकारचे प्रदूषण टाळता येईल.

९) **विकासासाठी डेटा —**

शाश्वत विकास उद्दिष्टांवरील प्रगतीला चालना देणाऱ्या विकासासाठी डेटा (D4D) वापर या संकल्पनेवर कार्यशाळा आयोजित करुन त्यांचेद्वरा G२० ते G२१, विकासासाठी डेटा, पर्यटन, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, शाश्वत विकास उद्दिष्टे, व्यापार, भारतीय विकास मॉडेल, महिला नेतृत्व विकास, बहुउद्देशीय विकास बँक सुधारणा आणि हवामान वित्त आणि हरित विकास करणे - यांबाबत विचार विनिमय केला जातो.

१०) **सायबर सुरक्षा आणि डेटा संरक्षण --**

कॉर्पोरेट नेटवर्क, सिस्टम आणि डेटाचे आक्रमण, नुकसान आणि अनधिकृत प्रवेशापासून संरक्षण करण्यासाठी एक प्रभावी सुरक्षा धोरण आखून त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करुन त्याद्वारे IT प्रक्रियेच्या सर्वसमावेशक विश्लेषणावर आधारीत ३६०° सेवा देऊन सायबर प्रणाली आणि नेटवर्क सुरक्षितता ऑप्टिमाइझ करण्यासाठी मार्गदर्शन केले जाते.

## ११) ई-गव्हर्नन्स आणि डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन ---

नागरिकांना सेवा प्रदान करण्यासाठी सरकार अधिकाधिक तंत्रज्ञानाकडे वळत आहे. ई-गव्हर्नन्सच्या वाढीला पाठिंबा देण्यासाठी तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधांचे पुनरावलोकन आणि सुधारणा करण्यासाठी सुरक्षा, विश्वासार्हता, स्केलेबिलिटी, इंटरऑरेबिलीटी, सुलभता, पारदर्शकता, अनुपालन व खर्च-प्रभाविता या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले जाते.

सध्या विविध सरकारी ई-गव्हर्नन्स क्षेत्रांमध्ये केंद्रित असलेल्या गोष्टी - डिजिटल नागरिक ओळख, सरकारी डेटा व्यवस्थापन, इमर्सिव्ह रिॲलिटी, सार्वजनिक सेवा ऑटोमेशन, क्लाउड कंप्यूटिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग, इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoT), ब्लॉकचेन इ.

## १२) उदयोन्मुख आणि भविष्यवादी तंत्रज्ञान ---

सन २०२३ मध्ये भारताच्या अमृत काळाची सुरुवात झाली. जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून भारताने आपले स्थान कायम ठेवल्याने सर्वसमावेशक कल्याण, डिजिटल अर्थव्यवस्थेला चालना, तंत्रज्ञान-आधारित विकास, ऊर्जा संक्रमण आणि गुंतवणूक आणि विकासाचे चक्र, यांच्या जोडीने सरकारचा सूक्ष्म स्तरावरील विकासाचा भर केंद्रस्थानी राहिला. त्याचवेळी जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांसारख्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यवर संस्थांकडून मिळालेल्या कामगिरीमुळे सर्वात वेगाने वाढणारी उदयोन्मुख बाजारपेठेची अर्थव्यवस्था म्हणून भारताचे स्थान अधिकच मजबूत झाले.

यामध्ये भारताने सार्वभौम हरित रोखे, महिलांच्या आर्थिक समावेशनाला सक्षम करणे, सुकन्या समृद्धी योजना (एसएएसवाय), राष्ट्रीय गुंतवणूक आणि पायाभूत सुविधा निधी (एनआयआयएफ), भारताच्या G२० अध्यक्षपदा अंतर्गत G२० फायनान्स ट्रॅक, २०२३, बहुपक्षीय विकास बँका (एमडीबी) मजबूत करणे, क्रिप्टो-मालमत्तेवरील आंतरराष्ट्रीय नाणेनिधी-आर्थिक स्थैर्य मंडळाचा (आयएमएफ-एफएसबी) विश्लेषण अहवाल, क्लायमेट फायनान्स (हवामान विषयक वित्तपुरवठा) साठी यंत्रणा, जागतिक कर्ज जोखमीचे व्यवस्थापन, G२० शाश्वत वित्तपुरवठा तांत्रिक सहाय्य कृती योजना (टीएएपी) या क्षेत्रांत भरीव कामगिरी केली आहे.

इतकेच नाही तर, पायाभूत सुविधांमधील गुंतवणुकीला चालना देण्यासाठी -- पायाभूत सुविधा उप-क्षेत्रांची सुसंगत अद्ययावत यादी, राष्ट्रीय पायाभूत सुविधा पाइपलाइन (एनआयपी), जी २० पायाभूत सुविधा कृती गट, नियामक सुधारणा, सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) ला प्रोत्साहन देणारे उपक्रम, T+१ सेटलमेंट (प्रणालीची स्वीकृती), इ. सारखे उपक्रम देखील राबविण्यात आले.

**हे सगळे जरी खरे असले, तरी G२० च्या अध्यक्षपदाची धुरा संभाळतांना भारतास ५ सर्वात मोठ्या आव्हानांचा सामना करावा लागणार आहे. ती ५ आव्हानं म्हणजे ---**

**१) रशिया-युक्रेन संघर्ष ----**

रशिया-युक्रेन संघर्ष यावर खूप कल्पकतेने व संवेदनशीलतेने विचार करणे आवश्यक आहे. केवळ या कारणामुळे G२० मधून रशियाला वगळणे हे पाश्चिमात्य देशांना फारसे परवडणारे नाही. तसेच हा संघर्ष देखील कायमस्वरुपी चालणारा नाही. त्यामुळे या परिस्थितीवर काही धोरणात्मक निर्णय घेऊन रशियाला थांबविण्यात यश मिळू शकते.

यासाठी सुवर्णमध्य काढला जाऊ शकतो तो म्हणजे — पश्चिमी राष्ट्रांनी रशियासाठी Red Line असलेले युक्रेनचे सदस्यत्व कोल्ड स्टोरेजमध्ये ठेवून त्याबाबत मुत्सद्देगिरी कायदेशीरपणे माघार घेण्यास भाग पाडले जाऊ शकते. पण हे वाटते तितके अगदीच सोपे नाही.

परंतु, यामध्ये दुसरी एक बाजू आहे - ती म्हणजे भारताचे पश्चिमी राष्ट्र आणि रशिया या दोन्ही देशांशी मैत्रीपूर्ण संबंध आहेत. आणि रशिया-युक्रेन हे दोघे केवळ युध्द आणि शस्त्रास्त्रांच्या माध्यमातून गुंतलेले आहे.

अशा ह्या रक्तरंजित गोंधळाच्या परिस्थितीत मार्ग काढणे हे भारतापुढे सर्वात मोठे आव्हान असेल.

२) **वाढत्या किमती ---**

दुसरे आव्हान म्हणजे अन्नधान्याच्या सातत्याने वाढणाऱ्या किंमती. यावर योग्य नियंत्रण आणल्यास सातत्याने वाढत्या किंमतींमुळे संपूर्ण जगास चलनवाढीचा सामना करावा लागतो आणि त्यातून निर्माण होणारे प्रश्न आपोपाच सुटणे शक्य होईल.

सध्या, G२० च्या १९ सदस्य राष्ट्रांपैकी तीन राष्ट्रांमध्ये चलनवाढीचा दर १० टक्क्यांहून अधिक आहे; तर सात सदस्य राष्ट्रांचा महागाई दर ७.५ ते १० टक्के आहे; पाच सदस्य राष्ट्रांचा चलनवाढीचा दर ५ टक्के ते ७.५ टक्के आहे; चार देशांचा चलनवाढीचा दर ५ टक्क्यांपेक्षा कमी आहे.

या सगळ्या अर्थव्यवस्थांची एकमेकांशी तुलना महागाईवर मात करणे हे काही साधारण आव्हान नाही, हे लक्षात येते.

३) **ऊर्जा ---**

रशियावर असलेल्या निर्बंधांमुळे जर्मनीसारख्या देशांमध्ये निर्माण होणारा गॅसचा तुटवडा, पश्चिमी राष्ट्रांचे अस्थतेचे थंड राजकारण, रशियाकडून नगण्य प्रमाणात तेल खरेदी केल्याचा भारतावर ठपका ठेवण्याची शक्यता, इ. ----

या सर्व आघाड्यांवर काम करणे हे एक मोठे आव्हान असेल. त्यासाठी ऊर्जा उत्पादक (USA, रशिया आणि सौदी अरेबिया) विरुद्ध ऊर्जा ग्राहक (युरोप आणि इतर) यांनी G२० एकाच व्यासपीठावर येऊन काम करणे आवश्यक आहे.

त्यांना एकत्र आणणे आणि यावर उपाय करण्यासाठी उद्युक्त करणे, हे भारतापुढील महत्वाचे आव्हान असेल.

### ४) राजकीय अस्थिरता

अन्नधान्य आणि ऊर्जेचा वाढत्या किंमती हे राजकीय अस्थिरतेचे एक प्रमुख कारण आहे. म्हणून त्या नियंत्रित करणे ही केवळ अर्थव्यवस्थांची गरज नाही तर राजकीय स्थैर्यासाठी देखील प्राथमिकता आहे. यावर उपाययोजना म्हणून चलनविषयक धोरणांचा व्या:जदर वाढविल्यास पुरठ्यासंबंधीच्या समस्या उद्भवतात.

यासाठी चलनवाढीला कोणताही धक्का न लावता व्यापार-उद्योगांस चालना देण्यासाठी G२० माध्यमातून भारताने नवीन कार्यसूची (agenda) तयार करणे आवश्यक आहे, ज्यामुळे नवीन अन्न पुरवठा साखळी तयार करण्यास प्रेरणा मिळेल. त्याचप्रमाणे अन्नटंचाईसाठी व्यवस्थापन करुन वाढत्या महागाईवर नियंत्रण मिळविण्यासाठी व्याजदर कमी ठेवण्यासाठी कल्पकतेने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

### ५) मंदीचा धोका

सततयाने वाढणाऱ्या चलनवाढीमुळे आर्थिक विकासाचा वेगदेखील मंदावतो. यावर एक धोरणात्मक उपाय म्हणजे लोकांना हातात रोख रक्कम देऊन त्यांची क्रयशक्ती वाढविणे. परंतु विकसनशील देशांमध्ये उपभोग आणि वाढीचे समीकरण व्यस्त असल्याने त्यावर मर्यादा येतात. त्याचप्रमाणे त्यासाठी आवश्यक ती संसाधने देखील कमी असल्याने लोकांच्या हाती रोख रक्कम देऊनही काही फारसा उपयोग होताना दिसून येत नाही.

यासाठी प्रत्येक गटाने अन्नधान्याच्या टंचाई असलेल्या अर्थव्यवस्थांवर अधिक लक्ष देऊन त्यावर मात करण्यासाठी भारताकडून G२० च्या माध्यमातून प्रयत्न करणे आवश्यक आहे. याबाबत शासनाने पुढाकार घेतल्यास त्याचे चांगले परिणाम दिसण्यास वेळ लागणार नाही, हे नक्की.

**परंतु, ही आव्हाने पेलत असतांनाच काही संधी देखील दिसून येतात---**

१) भारत देश विविध मूल्ये आणि तत्वज्ञानाचे प्रतिनिधीत्व करतो आणि जागतिक शांतता व सौहार्दासाठी भारताकडे एक वेगळी दृष्टी आहे.

२) भारतीय मुत्सद्दी विकास आणि आर्थिक सहकार्याला त्यांच्या अजेंडाच्या शीर्षस्थानी ठेवल्यामुळे उत्तर-दक्षिण सहकार्य आणि कनेक्टिव्हिटी पुनरुज्जीवित करण्यासाठी भारताचा नवीन आर्थिक धक्का - ही एक नवीन संधी असू शकते.

३) भारत अजूनही अधिक बहुपक्षीयता शोधत असल्याने, तुर्की, इंडोनेशिया, इराण, बांगलादेश, संयुक्त अरब अमिराती (UAE) आणि सौदी अरेबिया हे भारताच्या विकास मुत्सद्देगिरीसाठी अधिक महत्त्वाचे ठरणार आहेत. भारताचे G२० अध्यक्षपद हे जागतिक राजकारणात प्रगत भूमिकेसाठी भारताची इच्छा आणि तयारी दर्शविण्यासाठी एक अपवादात्मक संधी आहे.

**या सगळ्यांवरुन येणारा निष्कर्ष हा आहे की, ---**

## निष्कर्ष --

G२० हे एक असे व्यासपीठ आहे की ज्यामध्ये, आर्थिक संकटांना दिलेल्या प्रतिसादातून जागतिक आर्थिक सहकार्य आणि जागतिक प्रशासन बळकट करणे, जागतिक आव्हानांना संबोधित करणे व त्यातून मिळणाऱ्या यशाने जागतिक आव्हानांना तोंड देण्याची क्षमता निर्माण करणे, शाश्वत विकासाला चालना देणे, भौगोलिक-राजकीय सहकार्य, बहुपक्षीय संस्थांसह सहकार्य, असे अनेक विचार G२० च्या भविष्याला आकार देतील,

असे जरी असले तरी, G२० ला सर्वसमावेशकता, भौगोलिक, राजकीय ताणतणाव आणि अंमलबजावणीसाठी असलेली वचनबध्दता यांसंबंधी आव्हानांचा सामना करावा लागतो. परंतु, बदलत्या जागतिक परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी येणाऱ्या आव्हानांना तोंड देणे, आर्थिक परस्परावलंबन आणि बहुआयामी संकटांना सामोरे जाण्यासाठी खंबीरपणे उभे राहण्याच्या क्षमतेवर G२० चे यश अवलंबून असेल.

जागतिक आर्थिक धोरणे तयार करण्याची आणि शाश्वत विकासाला चालना देण्याची क्षमता - जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांमधील संवाद आणि सहकार्याचा एक मंच म्हणून G२० मध्ये आहे. त्याचे निरंतर यश अधिक स्थिर, न्याय आणि समृद्ध जगाच्या निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण असेल, हे नक्की.

**आता सगळ्यात मोठा प्रश्न म्हणजे --**

G२० च्या बाबींचा विचार आता, आपल्या भारत देशाने सन २०२२ मध्ये G२० च्या शिखर परिषदेचे अध्यक्षपद स्वीकारतेवेळी जी संकल्पना (Theme) घेतली होती — "वसुधैव कुटुंबकम" अर्थात "एक पृथ्वी-एक परिवार व एक भविष्य" ती कशा प्रकारे प्रत्यक्षात आणता येईल, याबाबत विचार करण्याचा.

ही संकल्पना संस्कृत महाउपनिषदातून घेतली असून, त्यामधून पृथ्वीवरील सर्व प्रकारच्या म्हणजे मानव, प्राणी, वनस्पती आणि सूक्ष्मजीव अशा सर्वांच्या जीवनाचे आणि पृथ्वी या ग्रहावर आणि व्यापक विश्वामध्ये त्यांच्यातील परस्परसंबधांचे महत्त्व दिसून येते आणि ती साकार करण्यासाठी "लाईफ" ( पर्यावरणासाठी जीवनशैली) या उपक्रमावर त्याच्याशी संबंधित,पर्यावरणीय दृष्ट्या शाश्वत आणि जबाबदार पर्यायांसह दिल्यामुळे स्वच्छ, हरित आणि नील भविष्य निर्माण करणाऱ्या जागतिक परिवर्तनकारक उपाययोजनांची निर्मिती होते.

यासाठी विविध स्तरांवरील G२० च्या बैठका केवळ नवी दिल्ली किंवा इतर महानगरांपुरत्याच मर्यादित राहणार नसून संकल्पनेतून प्रेरणा घेऊन, भारत ३२ वेगवेगळ्या कार्यप्रणालीशी संबंधित ५० हून अधिक शहरांमध्ये २०० हून अधिक बैठकांचे आयोजन केले असून जी- २० प्रतिनिधी आणि अतिथींना भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची झलक पाहण्याची आणि त्यांना भारताचा एक अनोखा अनुभव घेण्याची संधी यानिमित्ताने मिळाली आहे.

"वसुधैव कुटुंबकम्" या वाक्याचे महत्त्व ऐतिहासिक आणि समकालीन संदर्भांमध्ये जीवन आणि तत्त्वज्ञानाच्या विविध पैलूंमध्ये दडलेले आहे, जसे —

१) सार्वत्रिक बंधुत्व

२) शांतता आणि सुसंवाद

३) सांस्कृतिक आणि अध्यात्मिक वारसा

४) जागतिक जबाबदारी

५) आंतरराष्ट्रीय संबंध

६) आधुनिक प्रासंगिकता

७) नैतिक मूल्ये

८) मानवी हक्क आणि सामाजिक न्याय

ह्या सर्व मुद्यांमुळेच G२० साठी भारताने निवडलेली संकल्पना ही सध्याच्या जागतिक परिस्थितीत अगदी चपखल बसणारी आहे. परंतु, या उक्तीच्या अगदी विपरीत वागणारे भारताचे शेजारी देश आहेत.

त्यातच, संपूर्ण जगतिक अर्थव्यवस्थेस हवामान बदलाच्या समस्येने ग्रासले असतांना रशिया, चीन, युक्रेन यांसारखे युध्दांमध्ये विश्वास बाळगणारे काही देश, आपली शक्ती वापरुन दुसऱ्याला नेस्तनाबूत करण्याच्या खेळात गुंतल्याचे दिसून येते. त्यामुळे आपल्या संकल्पनेनुसार विचार केला असता त्यातील कोणत्याही देशास पराभूत करणे म्हणजेच आपल्याच परिवारातील एका भागाला नामोहरम करण्यासारखे आहे.

**हवामान बदलाचे परिणाम म्हणून —** बर्फाच्छादित प्रदेशांमधील बर्फ वितळणे, समुद्राच्या पाण्याच्या पातळीत वाढ होणे, फयान, त्सुनामीसारखी नवनवीन वादळे येणे, उष्णतेची लाट येणे, ढगफुटी होणे यांसारख्या गोष्टी आता प्रत्यक्ष घडताना दिसून येत आहेत.

**जैवविविधतेने संपन्न समुद्रकिनारे —** समुद्र किनारी समुद्री जीव, पक्षी यांचा उत्तम अधिवास, किनाऱ्यानजिक वसलेली गावे व त्यांची किनाऱ्यालगतची शेती, इ. अनेक गोष्टी आढळून येतात. तथापि, आता दरवर्षी समुद्र किनाऱ्यांचे बदलते स्वरुप जणू काही, हा समुद्रच त्याच्या किनाऱ्यांना गिळंकृत करु पाहतो आहे. समुद्र किनाऱ्यावर जगणाऱ्या सर्वांसाठी हे खूप भयावह आहे

**बर्फाच्छादित प्रदेश —** बर्फाच्छादित प्रदेश म्हणून विशेष आकर्षण असणाऱ्या गावांची, शहरांची आणि देशांची हवामान बदलामुळे तापमान वाढ होऊन या देशांचे अस्तित्व व जगणेच एक आव्हान झाले आहे. भारतातदेखील अनेक राज्यांमधील कृषी व्यवस्था व विकास यांना हवामान बदलाच्या, दुष्परिणामांना सामोरे जावे लागत आहे.

हरितवायूंच्या प्रमाणात वाढ झाल्याने पृथ्वीचे तापमानदेखील वाढले आहे.

**अशा प्रकारच्या समस्यांवर प्रभावी उपाययोजना राबविण्यासाठी ---**

- G२० माध्यमातून नवनवीन धोरणे, हरित तंत्रज्ञानाचा वापर इ. चा अवलंबिण्यात येत असलेले दिसून येते.
- युध्दांसारख्या जटिल समस्यांमध्ये मार्ग सापडण्यास वेळ लागणार असला तरी देखील, आपण एक जागरुक नागरिक म्हणून हवामान बदलावर स्थानिक स्तरावर काम करुन प्रत्येकानं थोडा हातभार लावणे आवश्यक आहे.
- "एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य" म्हणून काम करत असतांना ---


  १) एक कुटुंब म्हणजे एकता आणि असुरक्षितांचे संरक्षण करणे -

  २) एक पृथ्वी म्हणजे आपल्या ग्रहाचे, आपल्या घराचे संरक्षण करणे.

  ३) एक भविष्य म्हणजे प्रत्येकजण समृद्ध होऊ शकतो याची खात्री करणे.

भारतीय नोबेल पारितोषिक विजेते रवींद्रनाथ टागोर यांनी म्हटल्याप्रमाणे "आपण फक्त उभे राहून आणि पाण्याकडे टक लावून समुद्र ओलांडू शकत नाही ."

म्हणजेच, जागतिक संकटांवर मात करण्यासाठी सर्व देशांनी मिळून हातात हात घेऊन, एकमेकांमध्ये योग्य तो समन्वय साधून येणाऱ्या संकटांवर ठोस उपाययोजना केल्यास “एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य” ही संकल्पना प्रत्यक्षात येण्यात वेळ लागणार नाही.



संदर्भसूची ---


१) Youtube Videos — Study IQ IAS, Drishti IAS,

२) ORF website - https://www.orfonline.org वरील लेख

३) https://pib.gov.in वरील लेख

४) https://narendramodi.in वरील लेख

५) विकीपिडीया वरील माहिती

६) विविध वृत्तपत्रांमधील माहिती — सकाळ, लोकसत्ता, प्रहार

७) https://marathivishwakosh.org - G२० — मराठी विश्वकोष

८) https://g२०.in

९) https://g२०.org